॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

अहिल्यानगर ■ रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ५६ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ■ 9420802145


* सुविचार *

तुम्ही जगात बदल घडवू शकता, त्यासाठी पहिले स्वतःला बदला.

# राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताचा गोल्डन डे!

## एकाच दिवशी ८ सुवर्ण । बॉक्सरचा धमाका, ७ पदकांची कमाई

**नवी दिल्ली । वीरभूमी –** भारतासाठी शनिवारचा दिवस गोल्डन डे ठरला. कारण राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत आज एकाच दिवशी भारतीय क्रीडापटूंनी तब्बल ८ सुवर्ण पदकांची कमाई केली. यामध्ये भारतीय बॉक्सरनी सुवर्ण धमाका करीत एकाच दिवशी ७ सुवर्ण पदके पटकावली. सर्वप्रथम जॅस्मिन लांबोरिया (महिला ५७ किलो बॉक्सिंग), प्रीती पवार (महिला ५४ किलो बॉक्सिंग) या दोघींनी सुवर्ण कमाई केली. त्यानंतर साक्षी चौधरी (महिला ५१ किलो बॉक्सिंग), प्रिया घंसास (६० किलो बॉक्सिंग), अरुंधती चौधरी (७० किलो बॉक्सिंग) आणि अंकुश पंघाल (७५ किलो) आणि सचिन सिवाच (६० किलो) अशा ७ बॉक्सरनी सुवर्ण पदक पटकावले तर पॅरा एफ ५७ शॉट पुटमध्ये सोमन राणाने सुवर्ण कमाई केली. याच स्पर्धेत शुभम जुयालने रौप्य पदक मिळवत एकाच स्पर्धेत प्रथमच दुहेरी पदकाची कमाई करण्याचा मान या जोडीने मिळविला. विशेष म्हणजे आजच्या दिवशी भारताच्या ५ लेकींनी ५ सुवर्ण पदके पटकावली. एकूण १० बॉक्सरनी पदकांची लयलूट केली.



प्रारंभी जॅस्मिनने अंतिम फेरीत उत्तर आयर्लंडच्या मायकेला वॉल्शचा तर प्रीतीने कॅनडाच्या सवाना डोलमागोचा पराभव केला. यासोबतच साक्षी चौधरीने इंग्लंडच्या रुबी व्हाईटला, साक्षी चौधरीची चुलत बहीण प्रिया घंसासने कॅनडाच्या मारी-बथूल अल-अहमदियेहला आणि अरुंधती चौधरीने इंग्लंडच्या शँटल रिडला पराभूत करून सुवर्ण पदक पटकावले. यासोबतच भारतीय बॉक्सर अंकुश पंघालने इंग्लंडच्या डिमेजी शिट्टूचा पराभव केला. ७५ किलो वजन गटात ही लढत झाली तर सचिन सिवाचने नामिबियाच्या ट्रायअगेन मॉर्नी न्देवेलोचा पराभव करीत आठवे सुवर्ण पदक मिळविले. ६० किलो वजन गटात ही लढत झाली. या आधी पॅरा शॉट पुटमध्ये सोमन राणाने सुवर्ण कमाई केली होती. त्यामुळे बॉक्सिंगचे ७ आणि पॅरा शॉटमधील १ अशा ८ सुवर्ण पदकांची आज भारताने कमाई केली.

भारतीय बॉक्सरनी आज सुरुवातीला २ सुवर्ण पदकांची कमाई करून दिली. त्याचवेळी ७ भारतीय बॉक्सरनी अंतिम फेरीत धडक मारली होती. त्यामुळे या बॉक्सरच्या कामगिरीकडे भारतीयांचे लक्ष लागले होते. या बॉक्सरनी भारतीयांचा विश्वास सार्थ ठरवित ७ सुवर्णची कमाई केली. यातील जादूमणी सिंग मांडेंगबाम (५५), लव्हलिना बोर्गोहेन (७५) आणि नरेंद्र बेरवाल (९०) या तीन भारतीय बॉक्सरना रौप्य पदकावरच समाधान मानावे लागले. यासोबतच पॉरा शॉट पुट (गोळाफेक) मध्ये भारताच्या शुभम जुयाललाही रौप्य पदक मिळाले.

### एकाच प्रकारात २ पदकांची कमाई

■ भारताच्या सोमन राणाने पॅरा शॉट पुट (गोळाफेक) स्पर्धेच्या एफ-५७ गटात हंगामातील सर्वोत्तम कामगिरीची नोंद करत सुवर्णपदक जिंकले. याच स्पर्धेत भारताच्याच शुभम जुयालने रौप्यपदक मिळवले.

### ट्रिपल जंपमध्ये आणखी २ पदके

■ पुरुष गटातील ट्रिपल जंप प्रकारात भारताने आणखी दोन पदके जिंकली आहेत. प्रवीण चित्रवेलने १६.५८ मीटरची उडी मारून रौप्य पदक पटकावले तर त्याचा सहकारी भारतीय खेळाडू सेल्वा प्रभूने १६.५२ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीसह कांस्य पदक जिंकले.

## SPOT NEWS

### व्यावसायिक एलपीजी सिलिंडर २०० रुपयांनी स्वस्त

**नवी दिल्ली –** व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत १ ऑगस्टपासून मोठी कपात करण्यात आली आहे. तेल विपणन कंपन्यांनी १९ किलोच्या कमर्शियल एलपीजी सिलिंडरच्या दरात दिल्लीत २०२ रुपये, तर कोलकात्यात २०९ रुपयांची घट केली आहे. मात्र, घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. नव्या दरांनुसार, १ ऑगस्टपासून कोलकात्यात १९ किलोचा व्यावसायिक एलपीजी सिलिंडर २,८७२.५० रुपये दराने उपलब्ध होणार आहे. तर दिल्लीतही सिलिंडरच्या दरात २०२ रुपयांची कपात करण्यात आली असून व्यावसायिक ग्राहकांना याचा थेट लाभ मिळणार आहे. विशेष म्हणजे, सलग दुसऱ्या महिन्यात व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमती कमी करण्यात आल्या आहेत. व्यावसायिक वापरासाठी असलेल्या निळ्या एलपीजी सिलिंडरचे दर तेल विपणन कंपन्यांकडून सातत्याने कमी केले जात असले, तरी घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर मात्र 'जैसे-थे'च राहिले आहेत. म्हणजेच, घरांमध्ये वापरल्या जाणाऱ्या १४ किलोच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही.

### डिसेंबर महिन्यात जि. प. निवडणुका?

**नवी दिल्ली –** राज्यातील रखडलेल्या जिल्हा परिषद निवडणुकांचा मार्ग आता मोकळा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात निवडणुका घेण्याची तयारी दर्शविल्याने डिसेंबर महिन्यात जिल्हा परिषद निवडणुका होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, या निवडणुका ५० टक्के आरक्षण मर्यादेत घेण्यात आल्यास अनेक जिल्ह्यांतील आरक्षणाच्या समीकरणात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. याचा सर्वाधिक परिणाम नागपूर जिल्हा परिषदेत दिसून येऊ शकतो. सध्याच्या आरक्षणाच्या आराखड्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या निकषांनुसार एकूण ५७ जागांपैकी ३३ जागा विविध प्रवर्गांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत. या ३३ आरक्षित जागांमध्ये इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी १५ जागा, अनुसूचित जाती यांच्यासाठी १० जागा आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी ८ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

## 'स्पेसएक्स'चे भरकटलेले रॉकेट चंद्रावर आदळणार

**नवी दिल्ली । वीरभूमी–** एलॉन मस्क यांच्या 'स्पेसएक्स' कंपनीचे एक भरकटलेले रॉकेट वेगाने चंद्राच्या दिशेने झेपावत आहे. ते लवकरच चंद्रावर आदळणार आहे. हा 'स्पेसएक्स'च्या 'फाल्कन ९' रॉकेटचा वरचा भाग असून, जानेवारी २०२५ मध्ये दोन 'लूनर लँडर्स'सह त्याचे उड्डाण करण्यात आले होते. बुधवार, ५ ऑगस्ट २०२६ रोजी हे रॉकेट प्रचंड वेगाने चंद्राच्या पृष्ठभागावर धडकणार आहे. या भीषण टकरीमुळे चंद्रावर धुळीचे महाकाय लोट उठणार असून, या दुर्मिळ घटनेचा साक्षीदार होण्यासाठी जगभरातील शास्त्रज्ञ उत्सुक आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, या घटनेबाबत अंतराळ अभ्यासक बिल ग्रे यांनी सांगितले की, ही धडक तब्बल ८,७०० कि.मी. प्रतितास या अद्भूत वेगाने होईल. हा वेग ध्वनीच्या वेगापेक्षा सात पटीने अधिक आहे. चंद्राच्या सूर्यप्रकाश असलेल्या पश्चिमेकडील भागातील 'आईन्स्टाईन क्रेटर'जवळ ही धडक होईल. अमेरिकेच्या वेळेनुसार ही घटना भल्या पहाटे घडणार आहे. त्यामुळे अमेरिका आणि कॅनडाच्या पूर्व भागातून, तसेच दक्षिण अमेरिकेतील बहुतांश भागांतून हा थरार पाहता येणार आहे. आंतरराष्ट्रीय टीमच्या अभ्यासानुसार, या टकरीमुळे निर्माण होणारा धुळीचा लोट इतका चमकदार असेल की, चंद्राच्या काठाजवळ अंधाऱ्या आकाशात तो स्पष्टपणे दिसून येईल. अत्याधुनिक दुर्बीण असणारे हौशी खगोलप्रेमीही हा नजारा पृथ्वीवरून पाहू शकतील.

ही धडक चंद्राच्या समोरील बाजूला होणार असून, त्यातून ३ टन टीएनटी स्फोटाएवढी प्रचंड ऊर्जा निर्माण होईल. तज्ज्ञांच्या मते, टकरीचा लखलखाट अवघ्या एका सेकंदापेक्षा कमी वेळेचा असेल; मात्र, त्यातून उडालेला ढिगारा अनेक किलोमीटरपर्यंत पसरून दुर्बिणीद्वारे काही मिनिटांपर्यंत पाहायला मिळू शकेल. या धडकेमुळे उडालेल्या मलब्याचा लोट ७५ ते १०० किलोमीटर उंचीपर्यंत पोहोचेल, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

## राज्यात पावसाचा जोर वाढणार?; अनेक जिल्ह्यांना अतिवृष्टीचा इशारा

**मुंबई । वीरभूमी –** महाराष्ट्रात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, राज्यातील अनेक जिल्ह्यांना मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाने कोकण, घाटमाथा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भातील काही जिल्हे तसेच मराठवाड्यातील काही भागांत पुढील २४ तासांत जोरदार पावसाची शक्यता वर्तवली आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहण्याचा अंदाजही व्यक्त करण्यात आला आहे.

कोकण किनारपट्टी, मुंबई महानगर प्रदेश, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या भागांमध्ये पावसाचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता आहे. घाटमाथ्यावरील भागांतही मुसळधार सरींचा अंदाज आहे. विदर्भातील अमरावती, यवतमाळसह काही जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा धोका व्यक्त करण्यात आला आहे. पावसाचा जोर वाढल्यास नदी-नाले दुथडी भरून वाहणे, सखल भागांमध्ये पाणी साचणे, दरडी कोसळणे तसेच वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवली असून, नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

गेल्या आठवडाभरात राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. कोकण, घाटमाथा आणि पश्चिम महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस झाला. काही जिल्ह्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली असून शेती, रस्ते आणि दळणवळण व्यवस्थेवर त्याचा परिणाम झाला.

पुणे परिसरात जुलै महिन्यात विक्रमी पावसाची नोंद झाली असून अनेक वर्षांतील उच्चांक मोडल्याचे हवामान विभागाच्या आकडेवारीतून समोर आले आहे.

# लोकमान्य टिळकांचे विचार विकसित, सक्षम भारतासाठी मार्गदर्शक

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह । टिळक यांच्या १०६ व्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**पुणे । वीरभूमी –** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याला नवी दिशा देत राष्ट्रवाद, शिक्षण, पत्रकारिता आणि सामाजिक जागृतीचा भक्कम पाया रचला. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. तो मी मिळवणारच' हा त्यांचा विचार आजही भारतीयांना प्रेरणा देत असून विकसित आणि सक्षम भारताच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक ठरत आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले.

लोकमान्य टिळक यांच्या १०६ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित समारंभात राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केल्यानंतर ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार तथा पुरस्काराचे मानकरी अजित डोवाल, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक उपस्थित होते.

लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य लढ्याला जन आंदोलनाचे स्वरूप देत सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवांच्या माध्यमातून सांस्कृतिक राष्ट्रवादाची भावना जनमानसात रुजविली. 'केसरी' आणि 'द मराठा' या वृत्तपत्रांद्वारे निर्भीड पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला, तर राष्ट्रीय शिक्षणाच्या माध्यमातून देशभक्त नागरिक घडविण्याचे ऐतिहासिक कार्य केले, असे ते म्हणाले.

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार डोवाल यांच्या कार्याचा गौरव करताना ते म्हणाले, देशाच्या अंतर्गत व बा सुरक्षेला बळकटी देण्यात त्यांचे योगदान मोलाचे आहे. गुप्तचर यंत्रणेत अनेक आव्हानात्मक मोहिमा यशस्वीपणे पूर्ण करत त्यांनी राष्ट्रसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताची सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि निर्णायक बनविण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून, राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित अनेक धोरणात्मक निर्णयांच्या अंमलबजावणीत त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे.




पुरस्कार स्वीकारल्यानंतर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार डोवाल यांनी लोकमान्य टिळकांचे राष्ट्रवाद, स्वातंत्र्य, समाजजागृती आणि विचार प्रबोधनाचे कार्य आजही तितकेच प्रेरणादायी असल्याचे सांगितले. पुरस्कार स्वीकारणे हा आयुष्यातील मोठा सन्मान असल्याची भावना व्यक्त करत त्यांनी विकसित, आत्मनिर्भर आणि शक्तिशाली भारताच्या निर्मितीसाठी लोकमान्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले.

राष्ट्रहित हे सर्वांत सर्वोच्च मानून प्रत्येक नागरिकाने राष्ट्रनिर्माणात योगदान द्यावे. युवकांनी लोकमान्य टिळकांचे विचार आणि 'गीतारहस्य'चा अभ्यास करून समर्पण, त्याग आणि कर्तव्य भावनेने विकसित भारताच्या उभारणीत सहभागी व्हावे, असेही त्यांनी सांगितले. लोकमान्य टिळकांनी दिलेला स्वराज्याचा विचार आज राष्ट्रीय सुरक्षेच्या बळकटीत अधिक प्रभावीपणे प्रतिबिंबित होत असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. रोहित टिळक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

# SPOT NEWS

## मानव तस्करीविरोधी जनजागृतीसाठी पोलिस पाटील-कोतवालांची कार्यशाळा

**● संगमनेर I वीरभूमी –**
जागतिक मानव तस्करी विरोधी दिनानिमित्त श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाच्या वतीने संगमनेर येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात पोलिस पाटील व कोतवाल यांच्यासाठी कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत १२५ हून अधिक पोलिस पाटील व कोतवाल सहभागी झाले. सहाय्यक पोलीस निरीक्षक विकास ढोकरे यांनी मानवी तस्करी, वेठबिगारी व बालमजुरी रोखण्यासाठी गावपातळीवरील सतर्कता आणि जनजागृतीचे महत्त्व अधोरेखित केले. गोरख जाधव यांनी संबंधित कायदे, पीडितांचे संरक्षण आणि पुनर्वसनाबाबत मार्गदर्शन केले. जिल्हा समन्वयक सिराज शेख यांनी संस्थेने गेल्या चार वर्षांत अहिल्यानगर, पुणे व नाशिक जिल्ह्यांत २०० हून अधिक वेठबिगारांची सुटका करून त्यांचे पुनर्वसन केल्याची माहिती दिली. संस्थापक दिलीप गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमास विविध मान्यवर उपस्थित होते.

## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**● अहिल्यानगर I वीरभूमी –**
साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सिद्धार्थनगर येथे त्यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर रेसिडेन्शियल हायस्कूलच्या आवारात कलमी आंब्याचे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुनील सकट यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते इंद्रजीत साळवे, विद्यार्थिनी, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक व मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार व्यक्त करत केंद्र शासनाने त्यांच्या साहित्यिक व सामाजिक योगदानाची दखल घेऊन त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' प्रदान करावा, अशी मागणी केली. डॉ. सुनील सकट यांनी अण्णाभाऊ साठे हे सामाजिक परिवर्तनाचे योद्धे असल्याचे सांगत, त्यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपणातून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आल्याचे नमूद केले.

# पारनेरच्या पश्चिम वेशीवरील शिलालेखातून उलगडतो मुघलकालीन इतिहास

**हिजरी सन १०९३ (इ.स. १६८२) मधील नोंद I फौजदार अब्दुल करीम यांच्या काळातील बुरुज बांधकामाचा समकालीन पुरावा**

■ **विजय उंडे**

**● अहिल्यानगर I वीरभूमी –**
जिल्ह्यातील ऐतिहासिक पारनेर नगरीच्या किल्ले व गढीच्या इतिहासात अनेक महत्त्वपूर्ण वास्तू आणि ऐतिहासिक अवशेष दडलेले आहेत. त्यापैकी पारनेर येथील पश्चिम वेशीवरील बुरुजावर कोरलेला शिलालेख मुघलकालीन इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा ठरतो. सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वीचा हा शिलालेख तत्कालीन राजकीय, प्रशासकीय आणि लष्करी व्यवस्थेवर प्रकाश टाकणारा समकालीन पुरावा आहे.



■ छाया I विजय उंडे

हा शिलालेख पारनेर तालुक्यातील पारनेर गावातील पश्चिम वेशीवरील एका बुरुजावर कोरलेला आहे. शिलालेख कोरीव स्वरूपाचा असून चार ओळींचा आहे. तो देवनागरी लिपीत आणि मराठी भाषेत कोरलेला असल्याचे वाचनातून दिसून येते. अनेक वर्षे हा शिलालेख उघड्यावर असल्यामुळे वातावरणाचा त्यावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला आहे. त्यामुळे लेखातील काही अक्षरे झिजून पुसट झाली असून काही अक्षरे पूर्णपणे नष्ट झाली आहेत. मात्र, शिलालेखाचा छाप घेऊन अथक परिश्रमपूर्वक त्याचे वाचन करण्यात आले आहे.

### शिलालेखाचे वाचन

१.पातशाह आळमगीर सन १०९३
२.करीम बुरुज नवरस अमळ फउ
३.जदारी: करिम खान वा ताहेर
४.खान गोरी: सन येक हजार नउद तीन

शिलालेखाच्या वाचनावरून यात आलमगीर बादशहा औरंगजेबाच्या कारकिर्दीचा संदर्भ आढळतो. तसेच करीम खान आणि ताहेर खान घोरी या व्यक्तींचा उल्लेख असून फौजदारीशी संबंधित नोंद असल्याचे दिसून येते. शिलालेखातील हिजरी सन १०९३ ही कालनोंद या लेखाच्या ऐतिहासिक महत्त्वात मोठी भर घालते.

### मुघलकालीन प्रशासकीय व्यवस्थेचा संदर्भ

शिलालेखाच्या अर्थानुसार, आलमगीर पातशहा औरंगजेब यांच्या कारकिर्दीत अब्दुल करीम, हे ताहेरखान घोरी यांचे पुत्र असून पारनेरचे फौजदार होते. त्यांच्या आदेशाने अथवा देखरेखीखाली किल्ल्याच्या बुरुजाचे बांधकाम पूर्ण करण्यात आल्याचे या नोंदीतून स्पष्ट होते.

या शिलालेखामुळे तत्कालीन मुघल प्रशासकीय व्यवस्थेत फौजदार या लष्करी व प्रशासकीय अधिकाऱ्याची भूमिका, किल्ल्यांच्या देखभालीची जबाबदारी आणि स्थानिक पातळीवरील मुघल सत्तेची कार्यपद्धती यांचा अभ्यास करण्यास महत्त्वपूर्ण आधार मिळतो.

### किल्ल्याच्या बळकटीकरणाचा पुरावा

मुघल सत्तेच्या काळात महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांचे संरक्षण, दुरुस्ती आणि बळकटीकरण करण्यात आले. बुरुज हे किल्ल्यांच्या संरक्षणव्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचे स्थापत्य घटक होते. त्यामुळे बुरुजाच्या बांधकामाची नोंद करणारा हा शिलालेख केवळ एका बांधकामाची माहिती देत नाही, तर तत्कालीन लष्करी स्थापत्य आणि किल्ले संरक्षणाच्या धोरणावरही प्रकाश टाकतो.

शिलालेखातील हिजरी सन १०९३ ही कालनोंद पारनेरच्या किल्ला अथवा गढीच्या बांधकामाच्या इतिहासाचा काल निश्चित करण्यासाठी महत्त्वाची ठरते. उपलब्ध माहितीनुसार हा काल इ.स. १६८२ शी संबंधित असून, औरंगजेबाच्या कारकिर्दीतील हा समकालीन पुरावा आहे.

### इतिहास संशोधनासाठी महत्त्वपूर्ण दस्तऐवज

शिलालेख हे तत्कालीन काळातील प्रत्यक्ष आणि समकालीन पुरावे असल्यामुळे इतिहासाच्या पुनर्लेखनात त्यांना विशेष महत्त्व असते. राजकीय घडामोडी, प्रशासकीय अधिकारी, किल्ल्यांची बांधकामे, धार्मिक स्थळे, दानधर्म, सामाजिक व्यवस्था आणि स्थानिक व्यक्तींची माहिती शिलालेखांमधून मिळते.

पारनेरच्या या शिलालेखातून औरंगजेबाच्या कारकिर्दीतील पारनेरचा प्रशासकीय संदर्भ, फौजदार पदावरील अधिकारी, किल्ल्याच्या बुरुजाचे बांधकाम आणि त्याचा कालखंड यांची माहिती मिळते. त्यामुळे इतिहास, पुरातत्त्व, शिलालेखशास्त्र, मुघलकालीन प्रशासन, लष्करी स्थापत्य आणि महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी हा लेख अत्यंत उपयुक्त ठरतो.

### जतनाची गरज

अनेक वर्षे ऊन, वारा, पाऊस आणि अन्य नैसर्गिक घटकांचा सामना केल्यामुळे शिलालेखातील अक्षरे मोठ्या प्रमाणात झिजली आहेत. काही अक्षरे अस्पष्ट झाली असून काही ठिकाणी मजकूर पूर्णपणे नष्ट होण्याच्या स्थितीत आहे. त्यामुळे अशा ऐतिहासिक शिलालेखांचे शास्त्रीय पद्धतीने दस्तऐवजीकरण, छायाचित्रण, प्रतिकृतीकरण आणि संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे.

पारनेरच्या इतिहासाचा हा मौल्यवान ठेवा केवळ स्थानिक इतिहासापुरता मर्यादित नसून महाराष्ट्राच्या मुघलकालीन इतिहासाच्या अभ्यासासाठीही महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे संबंधित शासकीय यंत्रणा, पुरातत्त्व विभाग, इतिहास संशोधक आणि स्थानिक इतिहासप्रेमींनी या शिलालेखाच्या संवर्धनाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. या शिलालेखाच्या वाचन, अभ्यास, संशोधन व दस्तऐवजीकरण पुणे येथील अनिल दुधाणे यांनी केले आहे त्यांना डॉ. शैलेंद्र भांडारे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

# जातवैधता पडताळणीला वेग; ४६ हजार ७५५ प्रकरणे निकाली

**● कोपरगाव I वीरभूमी–**
बारावी विज्ञान तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाल्याने जातवैधता प्रमाणपत्रासाठी अर्जांची संख्या वाढली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रलंबित प्रकरणांच्या निकाली काढण्याला गती दिली आहे. १ एप्रिल २०२५ ते जून २०२६ या कालावधीत समितीकडे प्राप्त झालेल्या ४८ हजार ६४४ प्रकरणांपैकी ४६ हजार ७५५ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून, सध्या केवळ १,८८९ प्रकरणे प्रक्रियेत आहेत. त्रुटी असलेल्या अर्जदारांना ऑनलाइन प्रणालीद्वारे तत्काळ सूचना देण्यात आल्या आहेत.

अहिल्यानगर येथील जात पडताळणी समिती कार्यालयात प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांची गर्दी होत आहे. समितीच्या अध्यक्षा तथा अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह, सदस्य तथा समाजकल्याण उपआयुक्त बलभीम शिंदे आणि सदस्य सचिव तथा संशोधन अधिकारी अनिल तिदमे यांच्या मार्गदर्शनाखाली कामकाज सुरू आहे.

समितीचे काम पारदर्शक व गतिमान असूनही काही व्यक्तींकडून माध्यमांद्वारे दिशाभूल करणारी माहिती पसरवून समितीची बदनामी करण्याचा प्रयत्न होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. अशा प्रकारांची दखल घेत योग्य कारवाई केली जाईल, असे समितीने स्पष्ट केले आहे.

अनेक विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आले असतानाही ते प्रत्यक्ष कार्यालयात चौकशीसाठी येत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कार्यालयात हेलपाटे न घालता स्वतःच्या लॉगिन आयडी व पासवर्डद्वारे अर्जाची सद्यस्थिती तपासावी, असे आवाहन समितीने केले आहे.

सीईटीद्वारे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्जाची प्रत, पुराव्यांची प्रमाणित कागदपत्रे आणि मूळ शपथपत्र समितीच्या नागरी सुविधा केंद्रात जमा करावे, असे आवाहन संशोधन अधिकारी अनिल तिदमे यांनी केले.

### जातवैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे

■ प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह फॉर्म क्रमांक १५-अ, उमेदवाराचे दोन शालेय दाखले (प्राथमिक व माध्यमिक), वडिलांचा शालेय दाखला किंवा टी.सी., ओबीसीसाठी सन १९६७ पूर्वीचा, व्हीजे/एनटीसाठी १९६१ पूर्वीचा आणि एससीसाठी १९५० पूर्वीचा पुरावा, आजोबा, चुलते किंवा वडिलांचे मूळ जात प्रमाणपत्र, कुटुंबातील उपलब्ध असल्यास एका व्यक्तीचे जातवैधता प्रमाणपत्र, वडील निरक्षर असल्यास नोंदणीकृत साध्या कागदावरील शपथपत्र (१०० स्टॅम्प पेपर आवश्यक नाही), आवश्यक असल्यास भाऊ, बहीण किंवा वडिलांचे शालेय दाखले, जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र जोडता येईल.

> ऑनलाइन अर्ज भरताना स्वतःचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी नोंदवा. दलाल किंवा त्रयस्थ व्यक्तींकडे काम देणे टाळा. सर्व सूचनांचे काटेकोर पालन करा. अर्जाची हार्ड कॉपी अहिल्यानगर जात पडताळणी समिती कार्यालयात जमा करा. ऑनलाइन कळविलेल्या त्रुटी निश्चित कालावधीत दूर करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करा. कागदपत्रे अपलोड केल्यानंतर अर्जाची स्थिती मोबाईलवर तपासता येईल. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेत कोणतीही अडचण येणार नाही.
>
> – **अनिल तिदमे,** सदस्य सचिव, जिल्हा जात पडताळणी समिती, अहिल्यानगर

# पारनेरमध्ये स्वतंत्र 'निर्भया पथक' स्थापन करावे

**राष्ट्रवादी महिला काँग्रेसची पोलिस प्रशासनाकडे मागणी**

**● पारनेर I वीरभूमी–**
वाढत्या महिला सुरक्षेच्या प्रश्नावर गांभीर्याने विचार करत, पारनेर पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात तातडीने स्वतंत्र 'निर्भया पथक' स्थापन करावे, अशी आक्रमक मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे यांनी केली आहे. यासंदर्भातील एक महत्त्वाचे निवेदन त्यांनी नुकतेच पारनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांना सुपूर्द केले.


■ छाया I भगवान गायकवाड

सध्याच्या काळात विद्यार्थिनी आणि महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत ऐरणीवर आला आहे. महिलांना शिक्षण, नोकरी आणि दैनंदिन व्यवहार कोणत्याही भीतीशिवाय निर्भयपणे करता यावेत, यासाठी एक प्रभावी सुरक्षा यंत्रणा उभारण्याची नितांत गरज असल्याचे या निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे. पारनेर तालुक्यात हे पथक कार्यान्वित झाल्यास छेडछाड, अत्याचार यांसारख्या गुन्ह्यांना मोठा आळा बसेल आणि महिलांना आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ मदत मिळणे सोपे होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

पारनेर शहरातील प्रमुख चौक, सार्वजनिक ठिकाणे, बसस्थानके, शासकीय कार्यालये आणि गर्दीच्या परिसरात निर्भया पथकाद्वारे नियमित गस्त घालण्यात यावी.नागरिकांच्या माहितीसाठी आणि सुरक्षेसाठी प्रमुख ठिकाणी निर्भया पथकाचे संपर्क क्रमांक व कार्यपद्धती दर्शवणारे फलक व बॅनर्स लावण्यात यावेत. विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास व सुरक्षाविषयक जाणीव निर्माण करण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मार्गदर्शनपर कार्यक्रम, प्रबोधन सत्रे तसेच कायदेशीर हक्कांची माहिती देणारी शिबिरे आयोजित करावीत. फेसबुक, व्हॉट्सअॅप आणि इन्स्टाग्राम यांसारख्या समाजमाध्यमांद्वारे निर्भया पथकाचे संपर्क क्रमांक व सेवांचा मोठ्या प्रमाणावर प्रचार-प्रसार करावा.

निवेदन सादर करताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती तालुकाध्यक्षा अपर्णा खामकर, महिला शहराध्यक्षा कविता औटी यांच्यासह पक्षाच्या इतर महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिलांच्या सुरक्षेसारख्या अत्यंत संवेदनशील विषयावर पोलीस प्रशासनाने या मागणीची तातडीने व सकारात्मक दखल घेऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी जोरदार अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# मधुकरराव नवले यांच्या 'भाऊ - एक प्रेरणा गाथा' पुस्तकाचे दिमाखात प्रकाशन

**● अकोले I वीरभूमी –**
अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव (भाऊ) नवले यांच्या कार्यावर आधारित 'भाऊ – एक प्रेरणा गाथा' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा अभिनव शिक्षण संस्थेत उत्साहात पार पडला. अभिनव परिवारातील सर्व कर्मचाऱ्यांनी भाऊंविषयीच्या आपल्या भावना या पुस्तकातून शब्दबद्ध केल्या आहेत.

पुस्तकाचे प्रकाशन माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार डॉ. किरण लहामटे, दशरथ सावंत, एस. झेड. देशमुख, ज्येष्ठ पत्रकार शांताराम गजे, पांडुमामा घुले, प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख आणि सचिव विक्रम नवले यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्राचार्या अल्फोन्सा डी., पत्रकार हेमंत आवारी, शिवाजी नेहे, प्रा. विलास नवले, सतीश पाचपुते, एस. टी. येलमामे, प्राचार्य बी. वाय. देशमुख, उदय माळवे, डॉ. सुनील वैद्य, अनिल वाकचौरे, सतीश वाकचौरे तसेच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, अभिनव परिवार, बुवासाहेब नवले पतसंस्था व मल्टीस्टेटचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात पुस्तकाच्या संपादक प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख यांनी सांगितले की, हे पुस्तक म्हणजे अभिनव परिवारातील प्रत्येक घटकाच्या भाऊंवरील श्रद्धा, प्रेम आणि विश्वासाचे शब्दरूप आहे.

आमदार डॉ. किरण लहामटे यांनी मनोगतात सांगितले की, भाऊंनी उभी केलेली संस्था आणि इंग्रजी शिक्षणाची सुविधा अकोले तालुक्याच्या शैक्षणिक विकासातील महत्त्वाचा मैलाचा दगड आहे. माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी भाऊंचे कार्य दिशादर्शक, प्रेरणादायी आणि समाजपरिवर्तन घडविणारे असून त्यांनी संघर्षातून यशस्वी वाटचाल केली, असे गौरवोद्गार काढले.



■ छाया I विद्याचंद्र सातपुते

सत्कारमूर्ती मधुकरराव नवले यांनी आपल्या जीवनप्रवासातील महत्त्वपूर्ण आठवणींना उजाळा देत अभिनव परिवारातील सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. यावेळी संगीत शिक्षक इंद्रभान कोल्हाळ यांनी 'माणसा मी तुझे गीत गावे, ज्यात तुझे हित व्हावे' हे गीत सादर केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत मंडलिक व सोनिया नवले यांनी केले, तर सायन्स कॉलेजच्या प्राचार्य डॉ. कुसुम वाकचौरे यांनी आभार मानले.

# SPOT NEWS

## शिंगवे दत्ताचे येथे मध्यरात्री महिलेवर हल्ला; ९० हजारांचे सोन्याचे दागिने लंपास

**पाथर्डी । वीरभूमी –** तालुक्यातील शिंगवे दत्ताचे येथे मध्यरात्री घरात घुसलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी झोपेत असलेल्या महिलेचे तोंड दाबून तिच्या अंगावरील सुमारे १८ ग्रॅम वजनाचे ९० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकारात महिलेच्या दोन्ही कानांना दुखापत झाली असून, अज्ञात दोघांविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शोभा भगवान गाडेकर (वय ५०, रा. शिंगवे दत्ताचे, ता. पाथर्डी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्या पतीसह घरी झोपल्या होत्या. ३१ जुलै रोजी रात्री सुमारे १० वाजता जेवण करून घराचा दरवाजा उघडाच ठेवून त्या झोपल्या. १ ऑगस्ट रोजी पहाटे सुमारे २.३० वाजता दोन अज्ञात व्यक्ती घरात शिरल्या. यातील एका चोरट्याने त्यांचे तोंड दाबून धरले, तर दुसऱ्याने कानातील व गळ्यातील सोन्याचे दागिने जबरदस्तीने ओढून काढले. दागिने हिसकावताना त्यांच्या दोन्ही कानांना दुखापत झाली. आरडाओरडा होताच दोन्ही चोरटे घटनास्थळावरून पसार झाले. त्यानंतर त्यांनी पतीला जागे करून संपूर्ण प्रकाराची माहिती दिली. चोरीला गेलेल्या ऐवजात ३ ग्रॅम वजनाची सोन्याची फुले, ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे वेल, ५ ग्रॅम वजनाचे मनीमंगळसूत्र तसेच ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे डोरे व मणी, असा एकूण सुमारे ९० हजार रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास पाथर्डी पोलीस करीत आहेत.


## कै. बाजीराव पाटील सोनवणे वस्तीगृहात लोकशाहीर डॉ. साठे जयंती साजरी

**अहिल्यानगर । वीरभूमी–** शहरातील गांधी मैदान परिसरातील कै. बाजीराव पाटील सोनवणे वस्तीगृहात साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बाबा राजगुरू होते. प्रमुख उपस्थितीमध्ये मानवी हक्क अभियानचे जिल्हा संघटक तसेच भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा सरचिटणीस अशोक भोसले, ज्ञानदेव चांदणे, विकी साळवे, शेखर आडेप, वस्तीगृहाचे अधीक्षक, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक योगदानाचा गौरव करण्यात आला. आपल्या लेखणीतून त्यांनी शोषित, वंचित आणि कष्टकरी समाजाच्या भावना प्रभावीपणे मांडल्या. समता, स्वाभिमान, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश त्यांनी आपल्या साहित्याद्वारे जनसामान्यांपर्यंत पोहोचविला. विद्यार्थ्यांना अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा अभ्यास करून त्यांच्या संघर्षमय जीवनातून प्रेरणा घेण्याचे तसेच शिक्षण, परिश्रम आणि सामाजिक बांधिलकीच्या बळावर उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी अशोक भोसले म्हणाले, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून वंचित, शोषित आणि कष्टकरी समाजाच्या न्यायहक्कांसाठी संघर्ष केला. त्यांच्या साहित्यामध्ये समाजजागृती, स्वाभिमान आणि मानवतेचा संदेश प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. त्यामुळे त्यांचे विचार आजही तितकेच प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहेत. ते पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांचे जीवनचरित्र आणि साहित्याचा अभ्यास करून संघर्षातून यश संपादन करण्याची प्रेरणा घ्यावी. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन असून ज्ञानाच्या बळावरच समताधिष्ठित, सक्षम आणि संवेदनशील समाजाची निर्मिती होऊ शकते. प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जपत गरजू घटकांच्या उन्नतीसाठी कार्य केले, तर तीच लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांना खरी आदरांजली ठरेल.

# पाथर्डी उपजिल्हा रुग्णालय कर्मचारी वसाहतीत दुर्गंधी

### गटारे, सेप्टिक टँक तुंबले । प्रस्तावित २० फुटी रस्ता तातडीने सुरू करण्याची मागणी

**पाथर्डी । वीरभूमी –** उपजिल्हा रुग्णालय कर्मचारी वसाहतीतील गटारे व सेप्टिक टँक तुंबल्यामुळे संपूर्ण परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. याचा त्रास परिसरातील रहिवासी तसेच आमदार मोनिका राजळे यांच्या संपर्क कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना सहन करावा लागत असून, आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर विकास आराखड्यातील कर्मचारी वसाहतीतून जाणारा प्रस्तावित २० फुटी रस्ता तातडीने सुरू करण्यासाठी आमदार मोनिका राजळे यांनी पालिकेला निर्देश द्यावेत, अशी मागणी होत आहे.


छाया । अनिल खाटेर

उपजिल्हा रुग्णालय कर्मचारी वसाहतीतील बहुतांश कर्मचारी निवासस्थाने बंद असून, मोजकेच कर्मचारी येथे वास्तव्यास आहेत. त्यांनाही दुर्गंधीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून गटारे, सेप्टिक टँक व परिसराची स्वच्छता तसेच आवश्यक दुरुस्ती झालेली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

या वसाहतीच्या भिंतीलगत आमदार मोनिका राजळे यांचे संपर्क कार्यालय असून, हाकेच्या अंतरावर नगराध्यक्षांचे निवासस्थान आहे. शहरातील उच्चभ्रू परिसर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साईनाथ नगरातील रहिवाशांनी वेळोवेळी उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र, शासकीय इमारतींची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असल्याने या समस्येकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

देखभाल न झाल्याने परिसरात काटेरी झुडपे, गवत व कचरा साचला आहे. काही दिवसांपूर्वी वसाहतीतील रिकाम्या बंगल्याच्या आवारात सुरू असलेल्या नशेखोरांच्या पार्ट्या स्थानिक रहिवाशांनी बंद पाडल्या होत्या.

या इमारतीच्या मागील बाजूच्या कंपाऊंडलगत बाजारतळावरील खंडोबा मंदिर ते एडके कॉलनी असा प्रस्तावित २० फुटी रस्ता आहे. हा रस्ता पूर्ण झाल्यास परिसरातील अनेक समस्या कमी होण्यास मदत होईल. मात्र, राजकीय हस्तक्षेपामुळे हा रस्ता रखडल्याचा आरोप नागरिक करत आहेत. तसेच साईनाथ नगरातील अतिक्रमणे हटवून रस्ते मोकळे करण्याचीही मागणी होत आहे.

सध्या दुर्गंधी इतकी वाढली आहे की, भिंतीलगत राहणाऱ्या नागरिकांना दारे-खिडक्या बंद ठेवून राहावे लागत आहे. आमदारांच्या संपर्क कार्यालयात दररोज मोठ्या संख्येने नागरिक येत असल्याने त्यांनाही या दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. अर्बन बँक इमारतीपासून आमदारांच्या कार्यालयापर्यंतचा परिसर या समस्येमुळे त्रस्त झाला आहे.

दीर्घकाळ देखभाल न झाल्याने संरक्षक भिंतही धोकादायक बनली असून, सापांचा वावर वाढल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने सेप्टिक टँकची दुरुस्ती, गटारांची स्वच्छता आणि परिसराची देखभाल करावी, अशी नागरिकांची मागणी आहे. उपजिल्हा रुग्णालयाकडे यासाठी आर्थिक तरतूद नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## कोकमठाण येथील गुरुपौर्णिमा उत्सवात देश-विदेशातील भाविकांची हजेरी

**कोपरगाव । वीरभूमी–** कोकमठाण येथील विश्वात्मक जंगली महाराज आश्रमात आयोजित गुरू पौर्णिमा उत्सवात देश विदेशातील दिड लाखाहून अधिक भाविकांनी सहभाग घेतला. सामुहिक ध्यानधारण आणि संत पूजन हे या येथील उत्सवाचे वैशिष्ट असते. गूरूपौर्मिणेच्या पहाटे ओम गुरूदेव माऊलींचे पूजन संत परमानंद महाराज व संज निजानंद महाराजांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सुप्रसिध्द प्रवचनकार कणकेश्वरी देवी उपस्थित होत्या. तेवीस ते एकोणतीस जुलै या कालावधीत आश्रमाच्या वतीने अखंड अन्नदानाचे आयोजन करण्यात आले.

यंदा गुरूपौर्णिमे निमीत्त मध्य प्रदेशातील संत कणकेश्वरी माता यांच्या गुरूगीता कथेवर आधारीत प्रवचनांचे आयोजन करण्यात आले. त्यास भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. आत्मा मालिक शैक्षणीक संकुलातील विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी देखील या उत्सवात सहभाग घेतला. गुरूदक्षिणा म्हणून त्यांनी या उत्सवात भाजीपाला व धान्य भेट दिले. संत्सगासाठी सत्तर हजार स्केअरफुट आकाराचा मंडप उभारण्यात आला होता.

आत्मा मालिक ध्यान योग मिशनचे अध्यक्ष संत परमानंद महाराज उपाध्यक्ष निजानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी साहेब , सचिव हनुमंतराव भोंगळे व विश्वस्त मंडळाने उत्सवाचे नियोजन केले. सातेशहून अधिक स्वयंसेवक भाविकांना विविध सेवा सुविधा पुरविण्यासाठी कार्यरत होते.

केंद्रीय मंत्री कैलास विजय वर्गीय, जिल्ह्याचे पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालीनी विखे पाटील, आमदार आशुतोष काळे, आमदार विवेक कोल्हे, डॉ. सुधिर तांबे, दुर्गा तांबे, आमदार मंजुळा गावित, संजीवनी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नितीन कोल्हे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, संजीवनी विद्यापिठाचे प्रेसिडेंट अमित कोल्हे आदिंनी उत्सवात सहभाग घेत दर्शन घेतले.

ध्यान आणि मौनात मोठी शक्ती आहे. विश्वात्मक जंगली महाराज आश्रमात ध्यानधारणेसाठी देश विदेशातील भाविक येतात. गुरूपौर्णिमा उत्सवात देखील सत्संग आणि ध्यानाला महत्व दिले जाते, असे आत्मा मालिक ध्यानयोग मिशनचे अध्यक्ष परमानंद महाराज यांनी सांगितले.

## श्रीगोंद्यात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती उत्साहात

**श्रीगोंदा । वीरभूमी–** श्रीगोंदा शहरातील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात ससाणे नगर मित्र परिवाराच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. सकाळी मान्यवरांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे पूजन व ध्वजारोहण करून जयंती सोहळ्याला सुरुवात झाली.

यावेळी माजी मंत्री बबनराव पाचपुते, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस, उपनगराध्यक्षा अलका अनुभुले, नगरसेवक संग्राम घोडके, नगरसेविका आरती शिरवाळे, अरविंद कापसे आदी मान्यवर उपस्थित होते. खासदार निलेश लंके यांनी कार्यक्रमस्थळी भेट देऊन अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. नागवडे सहकारी कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनीही पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यानंतर शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत महिला-पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मिरवणुकीतील अण्णाभाऊ साठे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीमाई फुले, मुक्ता साळवे आणि लहुजी वस्ताद साळवे यांच्या वेशभूषेतील देखाव्यांनी विशेष लक्ष वेधून घेतले. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष कृष्णा ससाणे, उपाध्यक्ष प्रकाश ससाणे तसेच समितीचे पदाधिकारी व सदस्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले.


छाया । विजय उंडे

### विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

दरम्यान, जयंतीनिमित्त सिद्धार्थनगर जिल्हा परिषद शाळेत युवा उद्योजक बापूशेठ माने यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालक व नागरिकांनी स्वागत करून आयोजकांचे कौतुक केले.

### जयंतीनिमित ससाणे नगरमध्ये अन्नदान

जयंतीनिमित्त दुपारी वृद्धेश्वर बँकेचे चेअरमन विठ्ठलराव वाडगे यांच्या वतीने ससाणे नगर येथे अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे, नगरसेवक अनिल औटी, टिळक भोस, नाना शिंदे, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष निलेश गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष हरिदास शिर्के, नगरसेवक दादासाहेब औटी, भगवराव गोरखे, बापुराव गायकवाड, वसंतराव सकट, संदिप उमाप, कुणाल शिरवाळे, विशाल घोडके, लक्ष्मण घोडके, अवि घोडके, नंदकुमार ससाणे, नितीन ससाणे, मनोज घाडगे यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# आ. विवेक कोल्हे यांचे रक्तदान करुन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**कोपरगाव । वीरभूमी –** साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आमदार विवेक कोल्हे यांनी रक्तदान करुन त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले. डॉ. अण्णाभाऊ साठे स्मारक येथे आयोजित कार्यक्रमात त्यांनी उपस्थित समाज बांधवांना जयंतीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

डॉ. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक विचारांच्या माध्यमातून वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांच्या वेदनांना आवाज दिला. त्यांच्या लेखणीतून सामाजिक समता, बंधुता आणि स्वाभिमानाचा संदेश समाजापर्यंत पोहोचला. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आदर्श पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे आ. विवेक कोल्हे यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १ ऑगस्ट हा लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. यासह डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचे निर्माण करण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलली आहेत असेही कोल्हे म्हणाले.माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी जगातील सर्वप्रथम स्मारक कोपरगाव येथे उभारणीसाठी केलेल्या प्रयत्नांची आठवण यावेळी उपस्थितांनी केली.

जयंतीनिमित्त डॉ. अण्णाभाऊ साठे स्मारक येथे आयोजित रक्तदान शिबिरात आ. विवेक कोल्हे यांनी स्वतः रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. समाजातील प्रत्येक घटकाने सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होत गरजूंच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. रक्तदान हे श्रेष्ठ सामाजिक कार्य असून, एका व्यक्तीच्या रक्तदानामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, त्यामुळे युवकांनी मोठ्या संख्येने रक्तदानासाठी पुढे यावे, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास नगराध्यक्ष पराग संधान, उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, गटनेते प्रसाद आढाव, भाजपा तालुकाध्यक्ष विशाल गोर्डे, बबलूशेठ वाणी, दिलीप दारुणकर, विजय आढाव, राजेंद्र बागुल,संजय उदावंत, विनोद राक्षे, संतोष शिंदे, विक्रमादित्य सातभाई, कैलास मंजूळ, संदीप देवकर, आकाश वाजे, दत्तात्रय पगारे, संतोष चवंडके, गोपीनाथ गायकवाड, मयूर गायकवाड, गुर्मीतसिंग दडीयाल, इरफान कुरेशी, सोमनाथ म्हस्के, दीपक जपे, राहुल खरात, अल्ताफ कुरेशी, प्रशांत संत, हाजी फकीर मोहम्मद पहिलवान, संतोष शेजवळ, कलविंदरसिंग दडीयाल, निसार शेख, विजय चव्हाणके, रामचंद्र साळुंके, शफीकभाई सय्यद, सतीश रानोडे, धनंजय आढाव, शरद त्रिभुवन, खालिकभाई कुरेशी, सलीम पठाण, कैलास सोमासे, सुकदेव जाधव, सचिन त्रिभुवन, रोहित कनगरे, प्रभुदास पाखरे, संदीप निर्भवने, रवी शेलार, प्रदीप नवले, सिद्धांत सोनवणे, सोमनाथ लोहकरे, शंकर बोऱ्हाडे, सुजल चंदनशिव, अभिषेक मंजुळ, डॉ. किशोर नागरे, पांढरीनाथ वक्ते, चंद्रकांत वाघमारे, अजय शार्दुल, रावसाहेब साठे, बाळासाहेब पवार, संपत चंदनशिव, प्रतीक पगारे, सतीश चव्हाण, संतोषभाऊ आढाव, नाना भुजबळ, मुक्तार पठाण, लखन म्हस्के, भैय्या नागरे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


छाया । जनार्दन जगताप

# जिद्द, शिस्त आणि सातत्य हाच यशाचा खरा मंत्र

## आमदार आशुतोष काळे । श्री. छत्रपती शिवाजी विद्यालयात स्पर्धा परीक्षा व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ

● **कोपरगाव । वीरभूमी–**

आजचे युग हे अत्यंत स्पर्धेचे आहे अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी यश मिळवायचे असेल तर जिद्द, शिस्त आणि सातत्यपूर्ण परिश्रमाची साथ कधीही सोडू नये. ध्येय निश्चित करून प्रामाणिकपणे मेहनत घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणतीही स्पर्धा कठीण नसते. निरोगी शरीर, सकस आहार आणि नियमित अभ्यास या त्रिसूत्रीच्या बळावरच यशाचे शिखर गाठता येते असे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले.

कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव-कोळपेवाडी येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील अकॅडमी अंतर्गत कर्मवीर शंकरराव काळे स्पर्धा परीक्षा व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन शनिवार (दि.१) रोजी आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, रयत शिक्षण संस्था काळाच्या पाऊलखुणा ओळखून शिक्षणात नवनवीन प्रयोग करत असते. सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात संस्थेच्या शाळांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच इंटरक्टिव्ह बोर्ड यांसारखे अत्याधुनिक उपक्रम राबवले जात आहेत. संस्थेचे अध्यक्ष खा. शरदचंद्रजी पवार साहेब, चेअरमन चंद्रकांत दळवी, उपाध्यक्ष आणि मॅनेजमेंट कौन्सिलचे सर्व सदस्य नेहमीच विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दूरदृष्टीचे निर्णय घेतात. आजच्या स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी कुठेही मागे पडू नयेत तसेच विविध भरती प्रक्रियेत त्यांनी यश मिळवून बौद्धिक व शारीरिकदृष्ट्या परिपक्व होवून या देशाचा यशस्वी नागरीक व्हावे यासाठी संस्थेने कर्मवीर भाऊराव पाटील अकॅडमी सुरु करून महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

ज्या विद्यार्थ्यांना पोलीस किंवा सैन्यदलात करिअर करण्याची इच्छा आहे त्या विद्यार्थ्यांना कर्मवीर भाऊराव पाटील अकॅडमीच्या माध्यमातून प्रशिक्षणाचे नवे दालन खुले झाले आहे. अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी यशस्वी व्हायचे असेल तर जिद्द, शिस्त आणि सातत्यपूर्ण परिश्रमाची कास धरली पाहिजे. ध्येय स्पष्ट असेल आणि त्यासाठी प्रामाणिक मेहनत घेतली, तर कोणतीही स्पर्धा कठीण राहत नाही. मोबाईल हे आजच्या काळातील गरजेचे साधन असले तरी त्याचा वापर किती आणि कसा करायचा याचे भान विद्यार्थ्यांनी ठेवले पाहिजे. नाहीतर मोबाईलचे व्यसन लागू शकते. माणूस व्यसनामध्ये पूर्णपणे वाहून जातो त्यामुळे त्याचे आयुष्य उद्ध्वस्त होते. आपले आरोग्य व भविष्य चांगले घडवायचे असेल तर विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून पूर्णपणे



■ छाया । जनार्दन जगताप

दूर राहून जिद्दीने अभ्यास करून देशाची व राज्याची सेवा करावी. आपल्या कर्तृत्वातून आपल्या गावाचे, कुटुंबाचे, पालकांचे आणि शाळेचे नाव मोठे करावे असा मौलिक सल्ला आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी दिला.

याप्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुण चंद्रे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कचरु कोळपे, पं. स. माजी उपसभापती वाल्मिकराव कोळपे, दिलीपराव वाबळे, गौतम बँकेचे संचालक राजेंद्र ढोमसे, हेमंत वाबळे, कमलेश भळगट, यशवंत निकम, मोतीराम निकम, प्रशिक्षक गौतमी बनकर, राजेंद्र धुमाळ, बापूसाहेब वाबळे, प्राचार्य प्रकाश चौरे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संजीवनी इंजिनिअरिंगच्या १३ विद्यार्थ्यांची एलटीआय माईंडट्रीत निवड

## वार्षिक ५ लाखांचे पॅकेज, प्लेसमेंटचा आकडा ९३० वर

● **कोपरगाव । वीरभूमी–**

संजीवनी इंजिनिअरिंग महाविद्यालयाच्या ऑटोनॉमस दर्जा आणि सॅप प्रणालीच्या प्रशिक्षणाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळत असून, एकाचवेळी १३ विद्यार्थ्यांची एलटीआय माईंडट्री या बहुराष्ट्रीय कंपनीत निवड झाली आहे. या सर्वांना वार्षिक ५ लाख रुपयांचे वेतन पॅकेज देण्यात आले असून, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाविद्यालयाच्या प्लेसमेंटचा आकडा ९३० वर पोहोचला आहे.

महाविद्यालयाचे संचालक डॉ. आर. ए. कापगते यांनी सांगितले की, ऑटोनॉमस दर्जामुळे उद्योगजगताच्या गरजांनुसार अभ्यासक्रम राबविता येत आहे. तसेच सॅप (Systems, Applications and Products in Data Processing) या जागतिक सॉफ्टवेअर कंपनीसोबत

> मागील वर्षीही सॅप प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्याने आणि आकर्षक पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या. पदवी शिक्षणादरम्यानच सॅपसारख्या उद्योगाभिमुख प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिल्याने विद्यार्थ्यांचा वेळ आणि खर्च दोन्हीची बचत होते.
>
> **– अमित कोल्हे,** मॅनेजिंग ट्रस्टी, संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स

महाविद्यालयाचा सामंजस्य करार असल्याने विद्यार्थ्यांना प्रमाणित प्रशिक्षण दिले जाते. याच प्रशिक्षणाच्या आधारे लार्सन अँड टुब्रो समूहाची उपकंपनी असलेल्या एलटीआय माईंड्ट्रीने विद्यार्थ्यांची निवड केली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचे हर्षल बच्छाव, निलम परंदे, आकांक्षा बेल्हेकर, कल्याणी कर्डे, सार्थक तनपुरे, तृप्ती ठोंबरे, अखिलेश उन्निकृष्णन आयनिक्कदन, समृद्धी सोनवणे, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीचा प्रणव गागरे तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचे सुमित कोटमे, ईश्वरी माने, यशराज शिंदे आणि धनश्री शिरोळे यांचा समावेश आहे.

संस्थेचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे आणि मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच सॅप प्रशिक्षणाचे प्रभारी डीन डॉ. ए. बी. पवार यांचाही गौरव करण्यात आला.

# अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य उपेक्षितांच्या संघर्षाची पेटती मशाल : दिगंबर गाडे

● **पाथर्डी । वीरभूमी–**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी लेखणीच्या माध्यमातून उपेक्षितांना संघर्ष व हक्कासाठी लढण्यास प्रेरित केले त्यांची कला व लिखाणाची शैली व्यवस्थेविरुद्ध पेटती मशाल ठरली. समविचारी चळवळीला दिशा देण्याचे काम अण्णाभाऊंनी केले. असे मत राजश्री शाहू महाराज पतसंस्थेचे अध्यक्ष दिगंबर गाडे यांनी व्यक्त केले. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



■ छाया । अनिल खाटेर

पालिकेतील आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी शिवाजी पवार, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष पप्पू बोर्डे, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष श्रीपत बळीद, महेंद्र राजगुरू, गणेश दिनकर, जावेद पठाण, एकनाथ ठोकळ, अनिल दिनकर, अंबादास दिनकर, संतोष वाघमारे, रवींद्र दिनकर आदी प्रमुख कार्यकर्त्यांबरोबरच चळवळीतील विविध कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना गाडे म्हणाले, साहित्यातून लोक चळवळी कशा उभ्या केल्या जातात, याचे उत्तम उदाहरण लोकशाहीर यांनी दाखवून दिले. गरीब, पददलीत, उपेक्षित, कष्टकरी कामगारांच्या व्यथा त्यांनी लिखाणातून मांडल्या. शाहिरी कलेच्या माध्यमातून लोकांना संघर्षासाठी संघटित केले. संघटित व्हा, हक्कासाठी संघर्ष करा एकीची ताकद उपेक्षित वर्गाची मोठी ताकद आहे, आपले प्रश्न आपणच सोडू शकतो. यासाठी प्रश्नांचा अभ्यास करत त्यासाठी सर्व मिळून एकत्रितपणे पुढे यावे, म्हणून त्यांनी आपली हयात खर्च केली. साहित्याची रचना मुळातच उपेक्षित, शोषित व कष्टकरी वर्गाच्या प्रगतीसाठी असावी, असा आग्रह धरत अनेक लोकांना लिहिते, वाचते व बोलते केले. अण्णाभाऊंच्या साहित्याने जागतिक पातळीवर संघर्ष साठी सिद्ध असलेली पिढी तयार केली. राष्ट्र कोणतेही असो उपेक्षित, कष्टकरी वर्ग हा समदुखी आहे. सर्वांचे प्रश्न एक आहेत. या सर्व प्रश्नांना उत्तरही समान आहे. त्यामुळे भूमी, देश, भाषा, प्रांत अशा भिंती उपयोगाच्या नाहीत. याचा त्यांनी नेहमी अंगीकार केला. अण्णाभाऊंच्या विचारांची तरुण पिढी तयार झाल्यास समाजाचे प्रश्न सुट्टीलाच, परंतु प्रस्थापित व्यवस्थेला तेवढ्याच खंबीरपणे जबाब विचारणारी व्यवस्था तयार होऊ शकेल. यासाठी समविचारी कार्यकर्त्यांनी पुढे यावे असे आवाहन गाडे यांनी केले.

पप्पू बोर्डे यांनी प्रास्ताविक करून आभार मानले.

# उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचेकडून पारनेरच्या राजकीय, सामाजिक कामांचा आढावा

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची आ. काशिनाथ दाते यांनी घेतली सदिच्छा भेट

● **पारनेर । वीरभूमी –**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या अहिल्यानगर दौऱ्यादरम्यान पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार काशिनाथ दाते यांनी जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड यांच्यासह त्यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील राजकीय, सामाजिक परिस्थिती तसेच विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



■ छाया । भगवान गायकवाड

> या भेटीमुळे पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना गती मिळेल. शासनाच्या सहकार्याने आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघाच्या विकासाला नवसंजीवनी मिळेल, अशी अपेक्षा आहे.
>
> **– प्रशांत गायकवाड,** माजी संचालक, जिल्हा बँक

यावेळी आमदार काशिनाथ दाते यांनी मतदारसंघात सुरू असलेल्या विकासकामांची माहिती, प्रलंबित प्रकल्प, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, शेतकरी हिताच्या योजना तसेच आगामी काळात हाती घेण्यात येणाऱ्या विकासकामांचा सविस्तर आढावा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यासमोर मांडला. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील राजकीय घडामोडी, सामाजिक वातावरण, संघटनात्मक स्थिती तसेच सुरू असलेल्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. नागरिकांच्या अपेक्षा, स्थानिक प्रश्न आणि विकासाला गती देण्यासाठी आवश्यक बाबी जाणून घेत त्यांनी मतदारसंघाच्या विकासासाठी राज्य शासनामार्फत आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

याप्रसंगी आमदार काशिनाथ दाते यांनी राज्य शासनाच्या माध्यमातून मतदारसंघात विविध विकासकामांसाठी मिळत असलेल्या सहकार्याबद्दल उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचे आभार व्यक्त केले. शासनाच्या बळावर पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# पाथर्डी येथे निर्जन ठिकाणी नेऊन महिलेचा विनयभंग; एकावर गुन्हा दाखल

● **पाथर्डी । वीरभूमी–**

शहरातील एका ३५ वर्षीय महिलेचा कामाच्या ठिकाणी जायचे आहे असे सांगून निर्मनुष्य ठिकाणी घेऊन जात विनयभंग केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी संबंधित महिलेच्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला आपल्या दोन मुलींसह राहत असून मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. गेल्या सुमारे आठ वर्षांपासून ती संशयित सुहास येळाई याच्याकडे बिगारीचे काम करत होती. फिर्यादीनुसार, शनिवारी (दि. १ ऑगस्ट) सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास संशयिताने बिगारीच्या कामासाठी मोटारसायकलवरून गोरे मंगल कार्यालय परिसरात नेले. त्यानंतर आपल्याला पुढे काम आहे असे सांगून त्याने गायछाप कारखाना रस्त्यावरील निर्जन ठिकाणी मोटारसायकल थांबवली. तेथे महिलेचा हात धरून तिला जबरदस्तीने स्वतःकडे ओढत तिच्या इच्छेविरुद्ध अश्लील वर्तन केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकाराला महिलेने विरोध करून संशयिताला दूर ढकलले. व स्वतःची सुटका करून घेतली त्यानंतर संशयित तेथून निघून जाताना, पोलिस ठाण्यात तक्रार दिलीस तर तुला जीवे मारून टाकीन, अशी धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी पीडित महिलेच्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलिस ठाण्यात संबंधित आरोपीविरुद्ध विनयभंग व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पाथर्डी पोलीस करीत आहेत.

अशा संवेदनशील व महीला अत्याचाराच्या प्रकरणात पोलिसांनी कोणतीही तडजोड न करता निष्पक्षपणे चौकशी करावी व महीलांना न्याय द्यावा अशी मागणी जनतेतून होत आहे, अन्यथा पुन्हा एकदा पोलिसांच्या भुमिकेवर प्रश्नचिन्ह उभे राहणार आहे.